*बल्लारपूरला महाराष्ट्रातील सर्वाधिक विकसित व सुंदर शहर बनवा : ना. सुधीर मुनगंटीवार*

==========================================================

महाराष्ट्रातील अभिनव उपक्रम व वेगवेगळ्या पायाभूत सुविधा बल्लारपूर शहर व आसपास उभ्या राहात आहेत. त्यामुळे येत्या काळामध्ये बल्लारपूर शहराची ओळख महाराष्ट्रातील सर्वाधिक विकसित शहर अशी झाली पाहिजे. यासाठी प्रत्येकाने जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्रत्येक वार्डाला स्वच्छ, सुंदर आणि नागरिकांना सुविधा पुरविणारा परिसर बनविण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात येईल. हे शहर राज्यातील सर्वाधिक विकसित व सुंदर शहर म्हणून लौकीकप्राप्त ठरावे हे आपले स्वप्न आहे. नागरिकांच्या सहकार्याच्या व प्रेमाच्या बळावर हे स्वप्न निश्चीतपणे पूर्ण होईल, असा विश्वास राज्याचे वित्त नियोजन व वने मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज व्यक्त केला.

बल्लारपूर येथील पेपर मिल काटा गेट येथे रस्त्याच्या विभाजकाच्या सौंदर्यीकरणाचे भूमीपूजन करताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर वन विकास महामंडळाचे अध्यक्ष चंदनसिंग चंदेल, जि.प. अध्यक्ष देवराव भोंगळे, बल्लारपूरचे नगराध्यक्ष हरीष शर्मा, न.प. उपाध्यक्षा सौ. मिना चौधरी, बल्लारपूरचे नपचे मुख्याधिकारी बिपीन मुद्दा, अरूण वाघमारे' आदिंची प्रामुख्याने उपस्थिती होती.

बल्लारपूर शहरानजीक अनेक मोठे प्रकल्प उभे राहत आहेत. बॉटनीकल गॉर्डन, सैनिकी शाळा, अद्ययावत क्रीडा संकुल, बसस्थानक उभे राहत आहे. रेल्वे स्थानकाचे नाव देशाच्या नकाशावर झळकले आहे. मात्र हे सर्व होत असताना बल्लारपूर शहर देखील स्वच्छ, सुंदर आणि देखणे झाले पाहिजे, त्यामुळे राज्य शासनाच्या सर्व योजनांची मदत घ्या. तसेच आपल्या वार्डाला आवश्यक सुविधांनी परिपूर्ण करण्यासाठी योग्य प्रस्ताव सादर करा, चांगल्या कल्पक प्रस्तावासाठी आवश्यक निधी उपलब्ध करण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी केली.

यावेळी बल्लारपूर नगर परिषदेचे अरूण वाघमारे, येलय्या दासरफ, स्वामी रायबरन, रेणुका दुधे, कांता ढोके, भावना गेडाम,मिना चौधरी, महेंद्र ढोके, आशा संगीडवार, स्वर्णा भटारकर, पुनम मोडक, सुमन सिन्हा, वैशाली जोशी आदींची उपस्थिती होती.